नि. फौ. मा. क्र. २०/२०१८
शासन –वि– राजीक + १
निशाणी क्रं. ४३

**<u>सरकार तर्फे सा. क्र. २ यांची साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांवः विठोबा सखाराम वाघमारे,
वय– ५९ वर्षे, धंदा– सेवानिवृत्त,
रा. डेहनकर लेआउट भोसा रोड,
यवतमाळ, ता. जि. यवतमाळ.

०१. **सरतपासणी श्रीमती एस. एस. कांबळे, सहा. सरकारी वकील शासनातर्फे**

दि. २८/०८/२०१४ रोजी पंचायत समिती पुसद येथून प्रशांत जतकर, आरोग्य आस्थापना यांनी मला फोन केला व विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्र गौळ, ता. पुसद या ठिकाणी प्रयोग शाळा तंत्रज्ञ या पदाचे नियुक्ती आदेश आपल्या कार्यालयातून निर्गमित केले का. मी त्यांना ते आदेश कार्यालयाच्या ई–मेल आयडीला पाठवायला सांगितले. ते आमच्या कार्यालयाच्या ई–मेल आयडीला प्राप्त झाल्यानंतर मी शहानिशा केली असता, ते जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या सहीचे निर्गमीत केले नसल्याचे मला लक्षात आले. मी कार्यालयाचा अधिक्षक असल्याने मी कोणतीही फाईल पाठविली नव्हती. म्हणून मला ते लक्षात आले. नेमणुकीचे आदेश हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्या सहीने निघतात. माझे अधिकाऱ्यांनी याबाबत राउत यांना तक्रार द्यायला सांगितली. तक्रार दिल्यानंतर मला शेख राजीक अकबर शेख याचा प्रयोग शाळा तंत्रज्ञ म्हणून नेमणूकीचा आदेश काढल्याचे लक्षात आले.

०२. <u>उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे वकील श्री. इमरान देशमुख–</u>

हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयाला ई–मेल, फोन व तोंडी विचारणा केली जाते त्याबाबत आम्ही नोंद रजिस्टरला घेतो. मला जतकरांचा फोन आल्याचे व त्यांचे मेल आल्याची नोंद मी माझ्या कार्यालयात ठेवलेली आहे. मी तपासा दरम्यान पोलीसांना त्याबाबतची माहीती लिखीत स्वरुपात दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, कोणतीही माहीती आली की त्याचे आवक व जावक रजिस्टर ठेवले जाते. मी जतकरांच्या मेलची नोंद आवक रजिस्टरला घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, तो नेमणूकीचा आदेश प्राथमिक आरोग्य केंद्र गौळ यांना कोणी दिला होता याची मला प्रत्यक्ष माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला जतकरांचा फोन आला नाही व त्यांचे मेल प्राप्त झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मेल प्राप्त झाल्याच्या नोंदी माझ्या कार्यालयात नसल्याने मी त्या पोलीसांना दिल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या दबावामुळे आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

०३. <u>फेरतपास काही नाही</u>.

वा. दा. ब. अ. क. के. — माझे समक्ष

Digitally signed by ARCHANA MOHAN SHAH
Date: 2025.02.05 16:02:08 +0530

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ
दिनांक ०५/०२/२०२५.

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ